Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-VI JUN 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# होट्टल येथील स्त्री-मुर्तिशिल्पांचे अलंकार

डॉ.मारोती पोमा चव्हाण
(M.A. M.Ed. M.Phil., Ph.D., Set)

नांदेड जिल्हयातील देगलूर तालुका म्हणजे एकेकाळचे देवऊर, देवपूर होय. देगलूर हे ठिकाण महाराष्ट्राच्या पूर्वसीमारेषेवर वसलेले प्रमुख शहर होय. देगलूर पासून नैऋत्य दिशेस १२ कि.मी. अंतरावर होट्टल हे गाव आहे. या ठिकाणी कल्याणी चालुक्य काळातील एकुण तिन मंदिरे पाहावयास मिळतात. होट्टल या ग्रामनामाला प्राचीन कानडी रुप 'पोट्टल'[१] असे म्हणतात. या गावाच्या पश्चिमेला पूर्वाभिमुख सिध्देश्वर मंदिर आहे. इ.स. ११२० साली विक्रमादित्य सहाव्याच्या शिलालेखात[२] या मंदिरास दान दिल्याचे उल्लेख सापडतात. वन्ही कुलातील सिध्दुगीचा उल्लेख या शिलालेखात आढळतो.[३] या मंदिराची निर्मिती इ.स. ११२० मध्ये कल्याणी चालुक्य राजा विक्रमादित्य सहाव्याच्या काळात झाली. या मंदिरावर स्त्री मुर्तिशिल्पाचे प्रगटलेली आहे. संपूर्ण बाहयांग शिल्पांकीत करण्यात आले असून या मुर्तिशिल्पाचे सर्वप्रथम अध्ययन डॉ. देगलूरकर गो.बं. यांनी केले व ही शिल्पे प्रकाशात आणली.[४] सिध्देश्वर मंदिरातील स्त्री मुर्तिशिल्पाच्या माध्यमातून तत्कालीन अलंकार विषयक माहिती प्रकट होते. सिध्देश्वर मंदिरावर एकुण २८८ स्त्री-मुर्तिशिल्पे आढळतात. त्यापैकी मंदिराच्या बाहयांगावरील जगाति वर २४३ लहान विविध स्वरुपाच्या मूर्त्या आढळतात. तर गर्भगृहाच्या बाहयांगावर ४५ मूर्तीशिल्पे अनेक कोष्ठात बसविलेली आहेत. होट्टल येथील स्त्री-मुर्तिशिल्पात अलंकार धारण करण्याच्या स्वरुपात विविधता दिसून येते. अलंकारामुळे स्त्रीला प्रतिष्ठा प्राप्त होते. स्त्रीयांच्या भावना, सौदर्य व पावित्र्य अलंकारावर आधारीत असतात. प्राचीन काळात स्त्रीया सुंदर दिसण्यासाठी निसर्गात उपलब्ध असलेल्या वस्तूचा उपयोग केल्याचे दिसून येते. फुले, पाने, काच-कोंडी पासून अलंकार तयार होत असत. मृदूमूर्तिच्या शिल्पावरुन प्राचीन काळातील अलंकाराचे विभिन्न अंग दिसून येते. मानवाच्या श्रृंगारात सोने, चांदी, कास्य, पितळ, शिंपले, काच, कोंडया, माती, काष्ठ, लाख, बांस (वेळू) लोह, तांबे, अष्टधातू, पंचधातू, आणि सप्तधातू[५] या सोळा श्रृगाराचा उल्लेख अलंकाराच्या संदर्भात केलेला दिसून येतो. स्त्रीयांच्या सुंदरतेसाठी अलंकार धारण करण्याची परंपरा मानवी जीवनाच्या आस्तित्वापासून आहे. प्राचीन काळात भारतात सुवर्ण अलंकारासाठी 'निष्क' या शब्दाचा उल्लेख आलेला आहे.[६] अलंकार या शब्दासाठी पर्यायी शब्द म्हणुन भूपण, भूषण, विभूष, दागदागिने इत्यादी शब्दांचा उल्लेख केला जातो.[७] अलंकारावरुन तत्कालीन सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. समाजाच्या स्वरुपावरुन अलंकाराचे मोल ठरतात. बहूमूल्य धातूचा उपयोग अलंकारासाठी केला गेल्यास तो समाज राजदरबारी असल्याचे लक्षात येते. सुंदर दिसणे, समाजात आकर्षक प्रतिमा निर्माण करणे, संस्कृतिचे दर्शन घडविणे, प्रतिष्ठा वाढविणे, स्वाभाविक लक्षण दर्शविणे इ. अलंकार वापरण्याचे उद्देश आहेत.

होट्टल येथील स्त्री-प्रतिमांच्या हातात, पायात, कंबरेला, डोक्यावर, गळयात, कानात, नाकात, कपाळावर विविध स्वरुपाचे अलंकार पाहावयास मिळतात. त्यात प्रामुख्याने कर्णकुंडल, (कानफुल) कंठहार (गळयातील हार) बाजूबंद, बांगडया (गोट सारख्या) पैंजन (चैन) कडा, अलंकृत कंबरपट्टा व शरीरावरील शोभेच्या वस्तू निदर्शनास येतात. होट्टल येथील सिध्देश्वर मंदिरावरील बाहयांगावरील सर्व स्त्री मूर्तिशिल्पाच्या संदर्भात वरील सर्व प्रकारचे अलंकार निदर्शणास येतात. कल्याणी चालुक्य काळातील अलंकार पध्दतीची कल्पना करणे व तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचा दृष्टिकोन समजावुन घेणे या हेतुने विशेष महत्वाचे आहे.

**१) कर्णकुंडल (कर्णफुल)**

कानात धारण करावयाचा एक अलंकार म्हणजे 'कर्णकुंडल' होय सिध्देश्वर मंदिराच्या बाहयांगावर मंदिराच्या दक्षिणेला शत्रुमर्दिनीचे मुर्तिशिल्प **(छायाचित्र क्र. १)** शिल्पांकीत करण्यात आले असून, या शिल्पातील सुंदरीने आपल्या कानात कर्णकुंडल धारण केलेले आहे.[८] संपूर्ण कान या कर्णकुंडलाने झाकला गेलेला आहे. कर्णकुंडलाचा आकार कानाच्या आकारापेक्षा मोठा आहे. गोलाकार कर्णकुंड धारण केल्याने ती अप्सरा अथवा सुंदरी असल्याचे लक्षात येते, कर्णकुंडलावर नक्षीकाम अत्यंत बारकाईने केलेले असून कर्णकुंडलाच्या वरच्या भागातही अलंकृत नक्षीकाम पाहावयास मिळते. या मंदिराच्या दक्षिण बाजूवरील गुंठना सुंदरीच्या

**(छायाचित्र क्र. २)** एका कानातील कर्णफुल स्पष्टपणे पाहावयास मिळतात. या सुंदरीच्या कर्णफुलातून एक साखळी केसावरुन भांगापर्यंत गेलेली आहे. तसेच रतिसुंदरी व नृत्यांगणा स्त्री शिल्पातून कर्णफुलाची आकर्षक स्वप्ना लक्षात येते.[९] होट्टल येथील सर्वच सुंदरीच्या कानात साधारणतः सारखे नक्षीकाम व लहान मोठया आकाराचे कर्णफुल धारण केल्याचे लक्षात येते. कर्णफुलाच्या धाटणी लक्षात घेता राजमहलातील स्त्रीयांच्या कानातील अलंकाराप्रमाणे हे कर्णफुल असल्याचे जाणवतात.

**२) कंठहार :**

गळयातील दागीण्यामध्ये विविध धातूचे बनविलेले कंठहार अलंकार स्त्रीया धारण करीत असत होट्टल येथील सिध्देश्वर मंदिराच्या बाहयांगावरील सर्व स्त्री-मुर्ती शिल्पाच्या गळयात कंठहार अलंकार पाहावयास मिळतात. मंदिराच्या दक्षिणेकडील भागावर शुकसारिका मुर्तिशिल्प **(छायाचित्र क्र. ३)** आढळते. या शिल्पात गळयातील मोतीहारावर पोपटाने चोंच मारली आहे. जणु ती फळेच आहेत अशा समजुतीने[१०] या मुर्तिशिल्पात मोतिहार वृक्षभागावरुन दर्शविण्यात आलेला आहे. हा मोतीहार लोंबत्या स्वरुपात असून त्याचा आकार गळयाभोवती मोठा व वृक्ष भागावर लहान दाखविण्यात आला आहे. मंदिरावरील सर्वच मुर्तीच्या गळयात साधारणतः सारख्याच स्वरुपाचे मोतीहार, कंठहार, पाहावयास मिळतात. या मूर्तीच्या गळया नेकलेस सारखा एक अलंकार आहे. याचा आकार कंठहारापेक्षा लहान असून गळयाच्या सुंदरतेसाठी हा अत्यंत महत्वाचा आहे. मोतीहाराबरोबर या शिल्पमुर्तिच्या गळयात मण्याचे लोंबते हार, अक्षमाळा विशेष करुन दाखविलेले आहेत. ज्या नृत्यांगणा मूर्त्या आहेत, त्याच्या गळयात अत्यंत सूक्ष्म पाना-फुलांच्या नक्षीकामाचे घडीव अलंकरण करण्यात आलेले आहेत. या गळयातील अलंकारामुळे स्त्री मुर्तिचे सौंदर्य कलात्मक दृष्टया प्रगट झालेले आहे.

**३) बाजुबंद (दंडातील अलंकार)**

होट्टल येथील सिध्देश्वर मंदिराच्या बाहयांगावरील स्त्री-मुर्तिशिल्पात दंडात प्रामुख्याने दोन प्रकारचे अलंकार दिसून येतात. ज्यामध्ये बाजूबंद व मण्याचे हार किंवा अक्षमाला यांचा समावेश होतो. मंदिराच्या दक्षिणेकडील भागावर वादन करणारी स्त्री-प्रतिमा 'मर्दला'[११] दर्शविण्यात **(छायाचित्र क्र. ४)** आलेली आहे. या मूर्तिच्या हाताच्या दंडात दर्शनीय भागावर गोलाकार व नक्षीकामाने अलंकृत बाजूबंद दाखविण्यात आलेले आहे. बाजूबंदाच्या दर्शनिय भाग अत्यंत अलंकृत असून बाजूबंदाचा गोलाकार होणारा भाग मात्र पट्टाने दर्शविला आहे. बाजूबंदामुळे मर्दला मुर्तीशिल्पाची सुंदरता वाढलेली आहे.

या मंदिरावरील स्त्री-मुर्तिशिल्पाच्या दंडात अक्षमाळा आहे. या अक्षमाळा रुद्राक्ष, स्पटिक, हस्तिदंती[१२] इत्यादीच्या बनविलेल्या असतात. स्त्री मुर्ति शिल्पात अक्षमाला हाताच्या दंडात व मनगटात असल्याचे पाहावयास मिळतात. नृत्यांगणा व विविधांगी स्थितीत असलेल्या स्त्री-मुर्तिशिल्पात अक्षमाला धारण केल्याने मुर्तीची प्रमाणबध्दता वाढली आहे.

**४) बांगडया :**

हाताच्या मनगटात बांगडया असणे, सौभाग्याचे लक्षण असते. मोहजोंदडो येथे सापडलेल्या ब्रांझची स्त्री मूर्ती कंबरेवर हात ठेवलेली असून एका हातात संपूर्ण काखेपर्यंत बांगडया भरलेल्या आहेत.[१३] अर्थात अलंकार वापरण्याची पध्दत प्राचीन काळापासून प्रचलीत आहे. सिध्देश्वर मंदिराच्या बाहयांगावरील एका शिल्पामध्ये स्वतःचे नटणे; नीटनेटके झाले आहे, की नाही, हे आरशात न्याहाळणाऱ्या सुरसुंदरींना म्हणायचे 'दर्पणा.'[१४] **(छायाचित्र क्र. ५)** तीच्या डाव्या हातात सुंदर आरसा धरलेला असून ती लोकांच्या आनंदास कारणीभूत होते. दर्पणा मूर्तिशिल्पात उजवा हात डोक्यावरील केशसंभारात फुल खोचताना दिसते. या दोन्ही हातात एक-एक बांगडी निदर्शनास येतात. यावरुन ती अविवाहीत आहे. अशा स्त्रीया आपण कोण व कसे आहोत हे आपल्या स्वतः इतके दुसऱ्या कोणालाही कळत नसते. म्हणुन आपली आपणच पारख करुन घ्यावयाची असते. त्यासाठी निमित्त मात्र दर्पणा (आरसा) हे प्रतिकात्मक असावे. स्त्री-मुर्तीशिल्पात एक बांगडी (गोट) दाखविण्याचा उद्देश सुरसुंदरी अविवाहीत कुमारीका असल्याचे लक्षात येते.

**५) पैंजन (चैन)**

सिध्देश्वर मंदिराच्या बाहयांगावर एक प्रख्यात पद्मगंधा स्त्री-मुर्तिशिल्प पाहावयास मिळते. या स्त्री शिल्पात शीर्ष, शरीर तसेच दोन्ही पाय हे प्राधान्याने ललित विभ्रर्मान्त आहे.[१५] या दोन्ही पायात पैंजन धारण केलेले आहे. या मंदिराच्या बाहयांगावर एक नर्तकी दर्शविण्यात आलेली असून ती नाचुन दमलेली नृत्यांगणा पायातील चाळ (पैजन) सोडते आहे. नृत्य हे सदैव यातुविद्यात्कच

असते आणि आपल्या मध्ये सुसंस्कृत स्वरुपात नृत्य म्हणजे प्राधान्याने प्रियाराधनाचा एक विधी बनलेला आहे. तरुण तरुणीमध्ये एकमेकांविषयी आकर्षण निर्माण व्हावे हे त्याचे प्रयोजन असते.[१६] या प्रयोजनाने होट्टल येथील मुर्तीशिल्प कोरविण्यात आलेली आहेत. पैंजनाला घुंगरु आहेत ते विशिष्ट अंतरावर लावण्यात आलेले आहेत. घुगरुचा आवाज नाद निर्माण करणारा असून पैंजनाच्या वरच्या भागावर पायात एक कडा (वाळा) पाहावयास मिळतो. हा कडा पट्टीसारखा असून त्यावर बारीक अलंकृत नक्षीकाम निदर्शनास येते.

**६) कंबरपट्टा :**

सिध्देश्वर मंदिराच्या बाहय बाजूस एक स्त्री मुर्तीशिल्प आढळते. "एसा मातृसमामूर्ती बालकादिसुशोभीता हिलाच क्षीरार्णावात पुत्रवल्लंभा"[१७] म्हटले जाते. **(छायाचित्र क्र. ६)** या मुर्तिच्या कंबरपट्टया पासुन मण्यांच्या लोबत्या हारांची नक्षी वैशिष्टयपूर्ण आहे.[१८] ही घराची नक्षी मूर्तीप्रमाणे कंबरेच्या आकारानुसार साजेसा वाटतो. तसेच दर्पणा सुरसुंदरीत कंबरपटयापासून मण्यांचा लोबत्या हाराची नक्षी आहे. भोवती कटक लय व दोन्ही पायावर वनमानाचे अलंकरण करण्यात आलेले आहेत. दोन्ही पायाच्या मध्यरेषेत सोगा मुक्तदाम किंवा उरुदाम पायाच्या टाचेपर्यंत लोंबत आहे.[१९] स्त्रीयांच्या कंबरेतील अलंकारामध्ये कंबरपट्टा हा दागिना महत्वाचा असून हा दागिना चांदी, रुपे किंवा कासे या धातुपासुन बनवलेला असतो. सुरसंदरीच्या वस्त्राप्रवरणे अलंकारात कंबरपट्टा हा विशेष दागिना असून अत्यंत सुंदर पध्दतीने नक्षीकामाचा सूक्ष्मपणा कंबरपट्ट्याच्या माध्यमातून प्रगटतो.

याशिवाय होट्टल येथील सिध्देश्वर मंदिरातील बाहयांगावरील स्त्री मुर्तिशिल्पाच्या माध्यमातून स्त्रीयांची सौंदर्यपूर्णता व आकर्षकता दर्शनास येते. काही स्त्री मुर्तिच्या शिल्पात मस्तकाच्या मागच्या भागावर, डोक्यामागे प्रभावळ अर्धगोलाकार आहे. स्त्री कलाकाराची शिल्पे वादनात गुंतलेल्या, येणाऱ्या भक्तांना नादलुब्ध करीत असतात.[२०] देवताच्या सन्मुख उभे राहून या नृत्यांगणा देवतेला कलानैपुण्य अर्पण करीत आहेत. सगळया ललित कलांमधून आढळणारी मनोभावनेशी असलेली जवळीकता नृत्यातून दिसून येते. कुशल कलावंतानी, शिल्पकारांनी आपल्या मनातील भाव-भावना दगडरुपी शिल्पाच्या माध्यमातून जिवंत केल्याचे निदर्शनास येते.

कल्याणी चालुक्य काळातील कला परंपरेचे मानदंड येथील शिल्पकारांनी तंतोतंत पाळलेले दिसून येते. अलंकाराच्या माध्यमातून कल्याणी चालुक्य काळातील सांस्कृतिक जीवनाचा बोलपट रेखाटता येऊ शकतो स्त्री-मुर्तिशिल्पातून शिल्पकाराने कला क्षेत्रातील सूक्ष्म भावना स्वतंत्रपणे शिल्पांकीत केल्याचे लक्षात येते. स्त्री-जीवनात अविवाहीत स्त्रीयांना देवालयात नृत्य करण्याचे स्वतंत्र होते. या सुरसंदरी आपले शरीर सुंदर दिसावे म्हणुन विविध अलंकार धारण करीत असत. सिध्देश्वर मंदिराच्या सुरसुंदरी जणु स्वर्गातून पृथ्वीवर अप्सराच्या रुपाने आवतरीत झालेल्या आहेत. अलंकार धारणा कल्याणी चालूक्य काळात भक्तीभाव हेतून स्पष्ट करणारी आहे. तरुणी गायन, वादन, नृत्य करताना अलंकाराचा वापर करीत असत. अंतरीक सौंदर्यापेक्षा बाहय सौदर्य व शिल्पकराच्या भावना होट्टल येथील सुरसुंदरीच्या स्त्री-प्रतिमांच्या माध्यमातून पाहावयास मिळतात. सामाजिक, धार्मिक, वैचारिक व सौदर्य बोध आणि सामाजिक संगठनाच्या भावतेतून अलंकार धारण केले जातात. अलंकाराला स्त्री-दागिन्यापेक्षा ग्रह - नक्षत्र, ज्योतिष्य, मांगल्य, पावित्र्य, संस्कार समारंभ प्रसंगी धारण करण्याची प्रथा प्राचीन काळापासून ते आजतागायत पर्यंत चालू आहे. यातून मानवी मनाचा आविष्कार निदर्शनास येतो.

**संदर्भ सूची ः**

१)ठोसर, हरिहर, प्राचीन मराठवाडयाचे व्यक्तिमत्व मराठवाडा काल आणि आज, (संपादक : काळे भगवान) (पूर्वार्ध) संकेत प्रकाशन, प्रथमावृत्ती जालना, १९८६. पृ. ८०.

२)रित्ती, श्रीनिवास आणि शेळके, जी.सी., (सपा.) इन्सक्रिप्शन्स फ्रॉम नांदेड डिस्ट्रीक्ट, यशवंत महाविद्यालय, प्रथमावृत्ती, नांदेड, १९६८, लेख क्र. २२. पृ. २६.

३)देव, प्रभाकर, कला व शिल्प मध्ययुगीन मराठवाडा, महाराष्ट्रातील पुरातत्व (संपादक : सांकलिया ह.धी व माटे म.श्री.) महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ, प्रथमावृत्ती, मुंबई. १९७६. पृ. १०१.

४)देशमुख, भगवान, मुर्तिशिल्प वैभव, स्थानिक इतिहास आणि साहित्य : एक शोध, (संपा. अमिताभ राजन व इतर) नांदेड जिल्हा परिषद, प्रथमावृत्ती, नांदेड, १९८६. पृ. ६२.

५)www.https://hi.wikipedia.org/s/jey abhushan P. १.

६)देशमुख, प्र.रा., सिंधु संस्कृती ऋग्वेद व हिंदू संस्कृति, वाई प्राज्ञ पाठशाला मंडळ, १९६६. पृ. १५३.
७)जोशी, महादेवशास्त्री, (संपा.) भारतीय संस्कृतिकोश, (खंड पहिला) भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, प्रथामवृत्ती, १९७०. पृ. २९.
८)देशमुख, भगवान, इक्नोग्राफी ऑफ हिंदू टेम्पल्स इन मराठवाडा पब्लिकेशन स्कीम, जयपूर, प्रथमावृत्ती, १९८७. पृ. १९३.
९)देगलूरकर, गो.ब., सुरसुंदरी (मंदिराच्या बाहयांगावरील स्त्री-प्रतिमा) भारतीय विद्या भवन, प्रथमावृत्ती, पुणे. २००४. पृ. ४२.
१०)कित्ता. पृ. २५
११)कुलकर्णी, र.पु., (अनु.) शिल्पप्रकाश, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई २०००. पृ. २०००. पृ. ५१.
१२)सोमपुरा, ब.ल., भारतीय शिल्पसंहिता, (पूर्वार्ध) सोमैया पब्लिकेशन्स, प्रा. लि. प्रथमावृत्ती, नवी दिल्ली, १९७५. पृ. ११७.
१३)अग्रवाल, पृथ्वीकुमार, भारतीय संस्कृती की रुपरेखा, वाराणसी प्रकाशन, १९७०. पृ. २७.
१४)कुलकर्णी, र.पु., (अनु.) पुर्वोक्त. पृ. २७.
१५)कित्ता. पृ. ४६.
१६)कॉलिंगवुड, आर.जी., कलेची मुलतत्वे (भाषांतरकार-मालशे स.ग. व मिलिंद, मालशे) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई. २००४. पृ. ८८.
१७)देगलूरकर, गो.बं., मार्कंडादेव, (मार्कडी) हरिवंश प्रकाशन, प्रथमावृत्ती, चंद्रपूर, २००६. पृ. ७३.
१८)कुलकर्णी, र.पु., (अनुवाद) पूर्वोक्त. पृ. १४४-१४५.
१९) सोमपुरा, ब.ल., पूर्वोक्त. पृ. २०२.